IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** कोतवाली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0104 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**19/02/2025 07:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 18/02/2025

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/02/2025

**Time From (वेळेपासून):** 17:19 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:57 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/02/2025 **Time (वेळ):** 06:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 010

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/02/2025 07:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुनील रावसाहेब बंगाळ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1965

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रचनापार्क, साईसिटी, ताकोपरगाव,कोतवाली,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रचनापार्क, साईसिटी, ताकोपरगाव,कोतवाली,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9421030526

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अशोक मनोहर शिंदे | | | 1. तुळसाई पार्कच्या पाठीमागे, गाव, कोतवाली,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दि.19/02/2025

मी सुनील रावसाहेब बंगाळ, वय- 60 वर्षे, धंदा- सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक, रा. रचनापार्क, साईसिटी, ता. कोपरगाव, जि.अहिल्यानगर मो.न. 9421030526

मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहत असुन मी दिनांक 03/06/2022 रोजी रयत शिक्षण संस्थेच्या शारदा विदया मंदिर ,राहता या शाळेतुन माध्यमिक शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झालो आहे. सेवा निवृत्त झाल्यानंतर मला पेन्शन मंजुर झाली असुन ती मला नियमीत पणे मिळत आहे. परंतु प्रॉव्हिडंट फंड आज पावेतो मला मिळालेला नाही. माझे प्रॉव्हिडंट फंडाचे पैसे मिळणेसाठी मी वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,माध्यमिक, कार्यालय, अहिल्यानगर येथील सहाय्यक लेखा अधिकारी श्री. अशोक शिंदे यांना ब-याच वेळा जावून भेटलो असता ते टाळाटाळ करत होते. शेवटच्या भेटी दरम्यान त्यांनी मला सांगितले की, तुमचे काम खुप जुने आहे त्यासाठी तुम्ही मला 20,000/- रूपये दया मी तुमचे काम करून देईल. त्यावेळी माझ्या लक्षात आले की, श्री शिंदे साहेब हे माझ्याकडे माझे काम करण्याच्या मोबदल्यात 20,000/- रूपये लाचेची मागणी करत आहे मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे मी दिनांक 18/02/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर येथे आलो असता तेथे मला छाया देवरे मॅडम, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय अहिल्यानगर या समक्ष भेटल्या. मी त्यांना सदर बाबत माझे स्वहस्ताक्षरात तक्रार दिली व मी आज रोजी जिल्हा परीषद ,जुनी इमारत येथील वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, माध्यमिक, कार्यालय, अहिल्यानगर विभागातील श्री अशोक शिंदे साहेब,सहाय्यक लेखाधिकारी यांना भेटणार आहे असे सांगीतले होते.

त्यानुसार दि.18/02/2025 रोजी पोलीस निरीक्षक छाया देवरे मॅडम, कर्मचारी व पंच हे अहिल्यानगर येथे सुरक्षित ठिकाणी आले. सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक छाया देवरे मॅडम यांनी माझा परिचय त्यांचे सोबतचे कर्मचारी,दोन षासकीय पंचांसोबत करून दिला.

त्यानंतर मी वरील आषयाची माझी लेखी तक्रार पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांना दोन पंचासमक्ष तोंडी सांगीतली तसेच माझी लेखी तक्रार दोन्ही पंचांनी वाचुन पाहिली, त्यावर मी, दोन पंचांनी व पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सहया केल्या. त्यांनतर माझ्या तक्रारीवरुन श्री शिंदे साहेब, सहाय्यक लेखाधिकार, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, माध्यमिक, कार्यालय, अहिल्यानगर हे माझ्या वरील कामासाठी माझ्याकडे पुन्हा लाच मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सदर पडताळणी कारवाईमध्ये व्हॉईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबत मला, व पंचांना माहिती दिली, तसेच पडताळणी कारवाई बाबत सुचना दिल्या.त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे, दोन्ही पंचांचे तसेच पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांचे उपस्थिती बाबत निवेदन रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिले व श्री अशोक शिंदे साहेब यांची भेट घेण्यासाठी मला, पंच क्र.1 यांना माझ्या कडील चारचाकी वाहनाने रवाना केले.

त्यानुसार आंम्ही जिल्हा परीषद, जुनी इमारत येथील वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, माध्यमिक, कार्यालय, अहिल्यानगर विभागात गेलो असता त्याठिकाणी श्री शिंदे साहेब हजर होते, त्यावेळी मी त्यांच्या कार्यालयात त्यांची भेट घेण्यासाठी गेलो असता त्यांनी मला खुर्चीवर बसण्यास सांगितले त्यावेळी मी श्री शिंदे साहेब यांचेशी माझ्या कामासंदर्भाने चर्चा केली. मी सदरची चर्चा करून त्यांचे कार्यालयातून निघतेवळी श्री शिंदे मला म्हणाले की, वाटलंस ..काय तुम्हाला तर देवून जा, किती वर्षाच हे तुमच..बघा तुम्हीच..अॅडव्हान्स तुमचा? देवून टाका नंतर बोलू बाकीचं..जेव्हड काय करायचं..तेव्हड मग बघु बाकीचं,आज काय दयायचं ते दया तुम्ही..नंतर बघु बाकीचं. तेव्हा मी श्री शिंदे साहेब यांना बर ठिक हे चालेल मी एटीएम वरून येतो असे सांगून त्यांचेकडे पैसे आणण्यासाठी वेळ मागुन मी व पंच असे माझ्याकडील चार चाकी वाहनाने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो.

सदर बाबत मी व पंच क्र.1 अशांनी पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांना माहिती दिली, तसेच पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले.त्यावरुन श्री शिंदे साहेब यांनी माझ्याकडे माझ्या सेवानिवृत्ती नंतर मिळणा-या माझे प्रॉव्हिडंट फंडाचे पैसे मिळणेसाठीची फाईल पास करण्यासाठी लाच मागणी करून लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर श्री शिंदे साहेब, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, माध्यमिक, कार्यालय, अहिल्यानगर यांचे विरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा वापरण्यात येणार असुन त्याबाबत पोकॉ गायकवाड यांनी मला व पंचांना उजेडात व अंधारात प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांचे सुचनेवरुन श्री शिंदे यांनी लाचेच्या रक्कमेचा स्पष्ट उल्लेख न केल्याने सुरुवातीस मागितलेल्या 20000/- लाच रक्कमेपैकी लाचेच्या रकमेचा पहीला हप्ता 8000/- रुपये माझ्या बचतीतुन हजर केली. त्यात 500 रुपये दराच्या 16 भारतीय चलनी नोटा मी हजर केल्या, त्यानंतर सदर नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर नोटांवर अँन्थ्रासीन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली त्यानंतर मला व पंचांना सापळा कारवाई बाबत पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला त्यानंतर मला व पंच क्र. 1 यांना श्री शिंदे साहेब, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, माध्यमिक, कार्यालय, अहिल्यानगर यांची भेट घेवुन 8,000/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी माझ्याकडील चारचाकी वाहनाने रवाना केले. आमचे मागोमाग सापळा पथक आले. वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, माध्यमिक, कार्यालय, अहिल्यानगर येथे गेल्यावर श्री शिंदे साहेब यांच्या जवळ गेलो. पंच देखील माझ्या सोबत सदर ठिकाणी येवुन थांबले. त्यावेळी मी श्री शिंदे साहेब यांचेकडे पाहुन माझ्या शर्टच्या डाव्या खिशाला हात लावुन दहा हजार रुपये आणले आहेत पण दोन हजार रुपये मला भाडयाला राहू दया मी तुम्हांला 8,000/- रुपये देतो यावर श्री.शिंदे यांनी ठिक आहे असे म्हणुन माझ्याकडुन 8,000/-रुपये लाचेची रक्कम स्वीकारुन त्यांच्या उजव्या बाजूस असलेल्या टेबल ड्रॉव्हर मध्ये ठेवली. त्यानंतर मी मला ठरवुन दिलेला लाच रक्कम स्वीकारले बाबतचा डावा हात डोक्यावरुन फिरविण्याचा नियोजीत इषारा श्री शिंदे साहेब यांच्या कॅबीन बाहेर येवून सापळा पथकास केला असता बाजुला आडोशाला उभे असलेले पोलीस निरीक्षक देवरे मॅडम व सापळा पथक सदर ठिकाणी आले व लोकसेवक श्री शिंदे साहेब यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले. पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी माझ्याकडुन व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला. त्यावेळी पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी लोकसेवक श्री शिंदे यांना त्यांचे पुर्ण नाव, पद व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अशोक मनोहर शिंदे, वय-49 वर्षे, पद-सहायक लेखाधिकारी, वर्ग-2, नेमणुक- वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, माध्यमिक, कार्यालय, अहिल्यानगर, रा. तुळसाई पार्कच्या पाठीमागे, गावडे मळा, पाईपलाईन रोड, सावेडी,ता.जि. अहिल्यानगर असे सांगितले..

त्यानंतर लोकसेवक श्री अशोक मनोहर शिंदे, यांचे ताब्यातुन हस्तगत करण्यात आलेली लाच रक्कम सापळा कारवाई पुर्वी लिहुन घेण्यात आलेल्या नोटांच्या नंबरशी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळल्याची खात्री झाली. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी लोकसेवक अशोक मनोहर शिंदे, यांना सोबत घेवुन पुढील कामाकाज कामी ते लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर येथे आले. त्यांचे सुचनेप्रमाणे मी देखील तेथे हजर झालो. पोलीस निरीक्षक देवरे मॅडम व सापळा पथक यांनी त्यांचे त्या ठिकाणी पुढील कामकाज केले.

तरी दिनांक 18/02/2025 रोजी 17:19 वा ते 18:04वा. दरम्यान लाच मागणी पडताळणीच्या वेळी व 18:45 ते 18:57 वा.दरम्यान सापळा कारवाईच्या वेळी अशोक मनोहर शिंदे,, वय-49 वर्षे, पद- सहायक लेखाधिकारी, यांनी माझे सेवानिवृत्ती नंतरची प्रॉव्हिडंट फंड मिळण्यासाठीची फाईल पास करून देणेसाठी लाचेची मागणी करून 8000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी श्री अशोक मनोहर शिंदे,, वय-49 वर्षे, पद- सहायक लेखाधिकारी, वर्ग-2, नेमणुक- वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, माध्यमिक, कार्यालय, अहिल्यानगर, रा. तुळसाई पार्कच्या पाठीमागे, गावडे मळा, पाईपलाईन रोड, सावेडी,ता.जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:** **(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

Pratap Pandurang Darade(I (Inspector)) / API **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव)**:**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

प्रत मिळाली

शरद चं. वाघ
पो.हे.कॉ.१५१
कोतवाली पो.स्टे.अहिल्यानगर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** Pratap Pandurang D
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** API

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** घारगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0124 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/04/2025 04:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्यांची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 7
   **Date From (दिनांक पासून):** 16/04/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/04/2025
   **Time From (वेळेपासून):** 20:39 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 20:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/04/2025 **Time (वेळ):** 04:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/04/2025 04:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 25 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मारूती मंदिर समोर मांडवे,संगमनेर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री निलेश साहेबराव ○वरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | देवळाली प्रवरा, राहुरी कारखाना,राहुरी,राहुरी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | देवळाली प्रवरा, राहुरी कारखाना,राहुरी,राहुरी,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9604040420

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमजान नजीर शेख | | | 1. मांडवे ,संगमनेर ,घारगांव, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अक्षय ढोकळे | | | 1. तलाठी सजा मांडवे,संगमनेर , घारगांव,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

धारगांव पोलीस ठाणे जि.अहिल्यानगर

दिनांक 17.04.2025

फिर्याद

मी निलेश साहेबराव झावरे, वय 35 वर्षे, व्यवसाय व्यापार- खडी वाहतुक रा. देवळाली प्रवरा, राहुरी कारखाना, ता.राहुरी जिल्हा अहिल्यानगर मो.नं. 9604040420

मी वरील ठिकाणी आई, वडील, पत्नी, मुले भाऊ, वहिनी असे एकत्रकुटुंबी राहतो. माझेकडे खडी वाहतुकीच्या 04 ट्रक असुन त्याव्दारे मी गुरूकृपा स्टोन क्रेशर, वाबळेवाडी, स्वप्नपुर्ती स्टोन क्रेशर, पिंपाळे साहाराबाद येथुन खडी, डस्ट पावडर भरून त्याचीं ऑर्डरप्रमाणे विक्री करत असतो.

दिनांक 20.03.2025 रोजी माझे ट्रक क्रमांक एमएच 40 बास 8870 व एम एच 12 टिव्ही 9598 व्दारे खडी भरून घेवुन जात असतांना व माझेकडे गाडीतील खडीबाबत कायदेशीर ऑनलाईन काढलेली चलन पावती असतांना सदरच्या दोन्ही ट्रक मांडवे ता.संगमनेर चे तलाठी श्री अक्षय ढोकळे यांनी साकुर ता.संगमनेर या शिवारात पकडल्या होत्या. त्यावेळी मी त्यांना माझेकडे ट्रकमध्ये असलेले खडीबाबत ऑनलाईन चलन पावत्या दाखविल्या होत्या. मात्र त्यावेळी मी पावत्या दाखवुनही त्यांनी तु मला हप्ता देत नाही असे म्हणुन माझे दोन्ही ट्रकवर खोटी कारवाई केली व दोन्ही ट्रक धारगांव पोलीस स्टेशन येथे जमा केल्या आहेत. माझे ट्रकवर कारवाई झाल्याने तहसिलदार संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर यांनी माझे दोन्ही ट्रकवर प्रत्येकी 1,23,600/- रूपये दंड अशा दोन नोटीस मला बजावल्या आहेत. मात्र मी सदर दंडाचे नोटीसचे विरोधात संभाजीनगर हायकोर्टात दिनांक 09.04.2025 रोजी याचिका दाखल केलेली आहे.

काल दिनांक 15.04.2025 रोजी माझी मांडवे फाटयावर मांडवे गावाचे पत्रकार श्री रमजान शेख यांची भेट झाली. तेव्हा मी त्यांना माझे ट्रकवर झालेले कारवाई बाबत सांगितले व माझ्या अजुन दोन ट्रक आहेत, पण मी त्या खोटया कारवाईच्या धाकाने उभ्या करून ठेवल्या आहेत असे सांगितले. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, तलाठी ढोकळे साहेब माझे परीचयाचे आहेत, तुम्ही माझेकडे उद्या या, मी तुमची भेट घालुन देतो, त्यांचेशी बोलुन तुमची सेटलमेंट करून देतो, म्हणजे ते पुन्हा तुमच्या गाडया पकडणार नाही व गाडयांवर कारवाई करणार नाही असे सांगितले.

मी आज रोजी पत्रकार श्री रमजान शेख व तलाठी श्री अक्षय ढोकळे यांची भेट घेण्यासाठी मांडवे ता.संगमनेर येथे जाणार आहे. भेटीदरम्यान तलाठी श्री अक्षय ढोकळे हे माझेकडे माझ्या खडी वाहतुकीच्या ट्रक सुरळीत चालु देण्यासाठी व त्यांचेवर कारवाई न करण्यासाठी लाचेची मागणी करणार याची मला पुर्ण खात्री असल्याने व मला त्यांना लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने तलाठी श्री अक्षय ढोकळे यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणेसंदर्भात मी नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिनांक 15.04.2025 रोजी फोन करून तक्रार दिली होती.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने तलाठी श्री अक्षय ढोकळे हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणे कामी दिनांक 16.04.2025 रोजी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथुन आलेले श्री एकनाथ पाटील साहेब यांनी पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवुन माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन, पत्रकार श्री रमजान शेख व तलाठी श्री अक्षय ढोकळे यांचे भेटीसाठी रवांना केले. त्याप्रमाणे मी व पंच दिनकर बागुल अशांनी पत्रकार श्री रमजान शेख व तलाठी श्री अक्षय ढोकळे यांची मांडवे गावात मारुती मंदिराचे जवळ भेट घेतली असता, प्रथम मी माझे खडी वाहतुक ट्रक सुरळीत सुरू ठेवणेबाबत तलाठी श्री

अक्षय ढोकळे यांचेबरोबर चर्चा केली. काही वेळानंतर पत्रकार श्री रमजान शेख यांनी मला बाजुला थांबण्यास सांगुन नंतर माझेजवळ येवुन माझे तलाठी श्री अक्षय ढोकळे यांचेशी बोलणे झाले आहे. त्यांनी तुझ खडीचे ट्रक सुरळीत सुरू ठेवण्यासाठी व त्यावर कुठलीही कारवाई न करण्यासाठी दरमहा 40,000/- रूपये द्यावे लागतील असे सांगितले आहे. त्यानंतर मी पत्रकार श्री रमजान शेख यांचेबरोबर पुन्हा तलाठी श्री अक्षय ढोकळे यांची भेट घेवुन खडी ट्रक वाहतुकीबाबत चर्चा केली. त्यावेळी मी तलाठी श्री अक्षय ढोकळे यांना सांगितले की, मी तुम्हाला 50000/- रूपये देतो पण मला कुठलाही त्रास झाला नाही पाहिजे असे सांगितले असता त्यांनी, घेतो मी, पण तुम्हाला दोन महिनेच ट्रक चालवता येतील असे म्हणुन लाच स्विकृतीस संमती देवुन लाच स्विकारण्याचे मान्य केले. सदर बाबत सविस्तर पडताळणी पंचनामा पंचासमक्ष करण्यात आला आहे.

पत्रकार श्री रमजान शेख व तलाठी श्री अक्षय ढोकळे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम लागलीच घेऊन येण्याबद्दल मला सांगितले होते. त्याप्रमाणे दिनांक 16.04.2025 रोजी पंचासमक्ष सापळा पथक प्रमुख श्री एकनाथ पाटील साहेब यांनी लाचेच्या 50,000/- रुपये रकमेस अँन्थ्रासीन पावडर लावुन, त्याच्या गुणधर्माची माहिती देऊन व त्याचे प्रात्यक्षिक दाखवुन मला व पंच श्री दिनकर बागुल यांना आवश्यक त्या सुचना देऊन माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन पत्रकार श्री रमजान शेख व तलाठी श्री अक्षय ढोकळे यांना भेटण्यासाठी पाठविले. त्याप्रमाणे मी व पंच दिनकर बागुल असे मांडवे-गावात गेलो असता तेथे आमची पत्रकार श्री रमजान् शेख यांचेशी भेट झाली. भेटीदरम्यान त्यांनी व तलाठी श्री अक्षय ढोकळे यांनी मागणी केलेली 50000/- रूपये लाचेची रक्कम पत्रकार रमजान शेख यांनी माझेकडुन मांडवे गावातील मारूती मंदिरासमोर स्विकारली. म्हणुन त्यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले. त्यानंतर सापळा पथक व दोन्ही पंचासमक्ष पत्रकार रमजान शेख यांनी त्यांचे मोबाईल फोनवरून तलाठी श्री अक्षय ढोकळे यांचे मोबाईल वर फोन करून झावरे साहेबांनी पैसे दिले आहे 50000/- रूपये, काय करू असे सांगितले असता तलाठी श्री अक्षय ढोकळे यांनी बघु उद्या असे म्हणुन असे पत्रकार रमजान शेख यांनी स्विकारलेल्या लाचेच्या रकमेस संमती दर्शवुन प्रोत्साहन दिले. सदर कारवाई बाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी पत्रकार श्री रमजान शेख यांनी माझेकडील खडी वाहतुकीचे ट्रक सुरळीत सुरू ठेवण्यासाठी व त्यावर कुठलीही कारवाई न करण्यासाठी दरमहा 40,000/- रूपये द्यावे लागतील असे तलाठी श्री अक्षय ढोकळे यांनी सांगितले आहे असे सांगुन माझेकडे लाच रकमेची मागणी केली. त्यानंतर मी पत्रकार श्री रमजान शेख यांचेबरोबर पुन्हा तलाठी श्री अक्षय ढोकळे यांची भेट घेवुन खडी ट्रक वाहतुकीबाबत चर्चा केली. त्यावेळी मी तलाठी श्री अक्षय ढोकळे यांना सांगितले की, मी तुम्हाला 50000/- रूपये देतो पण मला कुठलाही त्रास झाला नाही पाहिजे असे सांगितले असता त्यांनी, घेतो मी, पण तुम्हाला दोन महिनेच ट्रक चालवता येतील असे म्हणुन लाच स्विकृतीस संमती देवुन लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर पत्रकार रमजान शेख यांनी 50000/- रूपये लाच रक्कम पंच साक्षीदारासमक्ष माझेकडुन स्विकारली व लाच रक्कम स्विकारल्यानंतर सापळा पथक व दोन्ही पंचासमक्ष त्यांचे मोबाईल फोनवरून तलाठी श्री अक्षय ढोकळे यांचे मोबाईल वर फोन करून झावरे साहेबांनी पैसे दिले आहे 50000/- रूपये, काय करू असे सांगितले असता तलाठी श्री अक्षय ढोकळे यांनी बघु उद्या असे म्हणुन पत्रकार रमजान शेख यांनी स्विकारलेली लाचेच्या रकमेस संमती दर्शवुन प्रोत्साहन दिले. म्हणुन माझी वरील दोघांविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाप्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

दिनांक

17.04.2025

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्रं.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

vilas sahadu pujari(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): vilas sahadu pujari
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):